rtmnuonline.com



**Bachelor of Science (B.Sc.) Semester—II (C.B.S.) Examination**

**MARATHI**

**Compulsory Paper—2**

वेळ : तीन तास] [एकूण गुण : 60

**सूचना** :—(1) सुवाच्य अक्षरे, मुद्देसुद उत्तरे आणि शुद्धलेखन अपेक्षित.

(2) सर्व प्रश्न अनिवार्य.

1. खालीलपैकी कोणत्याही **एका** विषयावर निबंध लिहा (शब्द मर्यादा **200**) :— 12

(1) मानवी जीवनात विज्ञानाचे महत्त्व.

(2) सूर्य मावळलास नाही तर ……

2. खालील प्रश्नांचे उत्तर लिहा (**200** शब्दात) :— 12

संत तुकारामांची विज्ञाननिष्ठा डॉ. किशोर सानप यांनी कशी पटवून दिली ?

**किंवा**

'गाव तिथं शाळा' या पाठातून लेखकाने साक्षरता अभियानाविषयी कोणते अनुभव सांगितले आहे ?

3. खालील प्रश्नाचे उत्तर लिहा :— 12

एकविसाव्या शतकाच्या उंबरठ्यावर जन्म घेणाऱ्या तान्ह्या मूलाला कवी कोणता उपदेश करतात ?

**किंवा**

'आणि पृथ्वीला हसू येते'… या कवितेचे आशयसौंदर्य उलगडून दाखवा.

4. खालील प्रश्नांची उत्तरे थोडक्यात लिहा :—

(अ) 'मराठी भाषेवर तुकोबांचा प्रचंड ठसा आहे' असे सदानंद मोरे यांना का वाटते. 3

**किंवा**

'लग्न ही स्त्रीला आमुलाग्र बदलविणारी घटना नसते' असे लेखिकेला का वाटते ?

(ब) कवीने शब्दांचे सामर्थ्य कसे विशद केले आहे ? 3

**किंवा**

कवीने पाहिलेले गाव कवीला हरविल्यासारखे का वाटते ?

(क) खालील वाक्प्रचारांचा अर्थ सांगून वाक्यात उपयोग करा :— 3

(1) पाणी जोखणे.

(2) कानाआड करणे.

(3) राम नसणे.

(ड) खालील शब्द शुद्ध करून पुन्हा लिहा :— 3

(1) मूद्देसुद

(2) परीपूर्ण

(3) अवचित्य

(4) देशानतर

(5) प्राथमीक

(6) तानत्रिक.

rtmnuonline.com

5. (अ) खालील उताऱ्याचा सारांश तुमच्या शब्दात लिहा :—

पंडित नेहरूंच्या सदऱ्यावर नेहमी ताज्या गुलाबाचे एक टपोरे फूल असायचे. जणू त्यांचे जीवनप्रेम, त्यांचा, त्यांचा जीवनानंद त्यातून प्रकट होत असे. जीवनाचे अनेक चित्रविचित्र रंग त्यांनी रसदृष्टीने न्याहाकले होते. आपल्या एका प्रसिद्ध भाषणात ते म्हणाले, 'जीवनातील आनंद कोणता ? प्रश्नाचे उत्तर कठीण आहे. पण मी तुम्हाला सांगू शकतो की, जीवनातील खरा आनंद म्हणजे एखाद्या उदात्त उद्दिष्टाशी जवलीक साधणे, स्वत:ला विसरणे, स्वत:च्या छोट्या तक्रारी आणि कुरकुरी विसरून जाणे. तुमची शक्ती संपली आणि नंतर तुम्हाला अडगळीत कुणी टाकले-तरी हरकत नाही. तुम्ही आपले काम केले यातच जीवनाचा खरा आनंद आहे. मी जीवनावर अमूप प्रेम केले. मात्र मी जीवनाचा गुलाम/कधी झालो नाही'. पंडितजींच्या आनंदशोधक, ध्येयनिष्ठ वृत्तीचे दर्शन घडविणारे हे उद्गार आहेत. 4

(ब) परीक्षेत प्रथम आल्याबद्दल बहिणाला अभिनंदन करणारे पत्र लिहा. 4

(क) माहितीचा अधिकार म्हणजे काय ? 4

835 www.rtmnuonline.com 835 www.rtmnuonline.com 835 835 835